||श्री ||

# प्रस्तावना – अमृतमंथन

डॉ. श्रीकृष्ण द. देशमुख यांची पराविद्येच्या प्रांतातील कामगिरी महनीय अशी असून सद्य समाजाला त्यांनी केलेले प्रबोधन खरोखरीच गुण विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असे आहे. विद्या आणि अविद्या या उभयतांचा साकल्याने विचार करून त्यांनी प्रगट केलेले शब्दब्रह्म केवळ वाचनीय नाही तर चिंतनीय आहे. प्रस्तुत लेखसंग्रहात त्यांनी प्रगट केलेले वेगवेगळ्या विषयांतील विचार महत्त्वाचे अशाचसाठी आहेत की, त्या विचारांच्या माध्यमातून स्वसंवेद्यतेसाठी मनुष्यमात्राने प्रवृत्त व्हावे. 'ब्रह्मघोटाळा' या शब्दावरील त्यांनी केलेले विवरण व ब्रह्मविषयक मांडलेला विचार खरोखरीच शब्दातीत असून प्रसादमय संपन्नतेतून त्यांनी शब्दांकित केल्याचा प्रत्यय 'ब्रह्मदर्शन' वाचल्यावर येत राहतो. वेदांतातील प्रमुख लक्षण विशद करतांना हृदयांतर्गत परमात्म्याचा संदर्भ देऊन तटस्थ लक्षणाचे विवरण केले आहे. औपनिषदिक तत्त्वज्ञानातील आनंदघनता महत्त्वाची असून अन्य सर्व भ्रामक आहे याची जाणीव डॉ. देशमुख मोठ्या खुबीने करून देतात. ब्रह्मदर्शनासाठी निरंतर अभ्यासाची कशी गरज आहे व चारी पुरुषार्थ, अध्यात्ममार्गातील पांथस्थ झाल्यावर कसे प्रचितीस येतात याची जाणीव अभ्यासकाला डॉ. देशमुख यांचे विचार वाचतांना झाल्यावाचून राहत नाही.

'श्रीसमर्थांचा जीवनवाद' हा त्यांचा लेख अनुभूतीतून निर्विवाद स्थिती अनुभवण्यासाठीच आहे. उपासना, तिची पथ्ये, तसेच ईश्वराची सर्वनियामकता याचा बोध डॉक्टरांच्या लेखातून होतो. 'स्वामी म्हणे माझा नाथ संप्रदाय।' या लेखात डॉक्टर साहेबांनी '**आत्मा अरे वा श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यो ।**' या श्रुतीचे श्रवण, मनन, निदिध्यासनासाठी व आत्मज्ञानाच्या प्रगटीकरणासाठी मुद्दामच आत्मानुभूतीतून प्रवर्तन केले आहे. डॉक्टरसाहेबांनी वृद्ध जीवनासाठी विचार प्रगट करत असतांना अत्यंत सूक्ष्म जाणीवेतून श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील सांगितलेल्या दैवी संपदेचा पुरस्कार केला आहे. भरतवर्षातील कीर्तनाची अव्याहत परंपरा लक्षात घेऊन '**कीर्तनाच्या सुखे सुखी होई देव । पंढरीचा राव संगी**

**असे ।**' हे तुकाराम वचन स्वानुभवाला कसे पुष्ट करणारे आहे हे वाचल्यावर डॉक्टरांचे आत्मसंकीर्तन मनाला भावल्यावाचून राहत नाही.

संतसाहित्यविषयक वाङ्मय वाचून त्यातील नेमकेपणा ध्यानात येतोच असे नाही. संतसाहित्याचा व्यष्टी व समष्टीवरील संस्कार प्रगट करतांना, '**ज्ञानदीप लावू जगी ।**' हा विचार मोठ्या खुबीने प्रगट करून डॉक्टर आत्मज्ञानाचा दिनकर पाहण्यास स्वतःही प्रवृत्त आहेत व इतरांनाही प्रवृत्त करतात असे वाटल्यावाचून राहात नाही.

'सुखाचा शोध आणि बोध' या लेखात आत्मबोधविरहित भाव सुखाच्या आड येणारे असे असून हलकेच शाश्वत सुखाच्या मार्गाकडे कसे जावे हे सांगितले आहे. नरदेहाचे महत्त्व विशद करत असतांना '**अंतर्निष्ठ तितुके तरले । अंतर्भ्रष्ट ते बुडाले ।**' या संस्कारावर भर देऊन, '**या नरदेहाचे उचित । काही करावे आत्महित ।**' हा समर्थांचा संदेश माणसाच्या मनात वितरित केला आहे. गुणपरंपरागत मार्गाने भगवद्भक्तीचा झेंडा आपल्या खांद्यावर फडकावत '**देखेन त्याला शहाणा करीन ।**' या गुरुनाथ उक्तीला अनुसरून डॉक्टर श्रीकृष्ण देशमुख आपला अध्यात्मपथ आत्मसंतुलित अवस्थेत, अनेकांच्या शुभाशीर्वादाने मंडित होऊन, गुरुकृपांकित राहून चालत आहेत. ही त्यांची चाल वेदांत, औपनिषदिक तत्त्वज्ञान, दर्शने, संतवाङ्मय तसेच विश्वातील विविध तौलनिक तत्त्वज्ञाने या सर्वाला अनुसरून अशीच असल्याने व संतांच्या आशीर्वादाने, मोठी डौलदार झाली असल्याने त्यांच्या अनुयायात, शिष्यात, त्यांच्यावर प्रेम करणाऱ्यांच्यात, त्यांच्या सहवासात येणाऱ्यांच्यात निर्वातीच्या दीपाप्रमाणे वितरित होत राहो ही सदिच्छा!

गुरुनाथ वि. मुंगळे